# खासगी विद्यापीठाचे विधेयक चर्चेविना मंजूर करणे चुकीचे-डॉ. नरेंद्र जाधव

औरंगाबाद, दि. २४ (प्रतिनिधी)- खासगी विद्यापीठाचे विधेयक राज्य सरकारने पावसाळी अधिवेशनात कोणत्याही चर्चेविना मंजूर केले. ही राज्य सरकारची गंभीर चूक असल्याची रोखठोक भूमिका नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी आज येथे घेतली.

खासगी विद्यापीठाचे शिक्षण दर्जेदार असल्याचे मान्य करून या विद्यापीठात मागासवर्गीयांना आरक्षणाची तरतूद असावी, अशी मागणी जाधव यांनी केली. खासगी विद्यापीठांत दर्जेदार शिक्षण मिळेल मात्र ते दलित मागासवर्गीयांना मिळत नसेल तर त्याचा काय उपयोग? असा सवाल करून पावसाळी अधिवेशनात या विधेयकावर अधिक चर्चा होण्याची गरज होती. राज्य सरकारने हे विधेयक चर्चेविना मंजूर केल्याने चूक झाली, असे जाधव म्हणाले.

दारिद्र्यरेषेखालील नियोजन आयोगाने सर्वोच्च न्यायालयात जे प्रतिज्ञापत्र सादर केले ते योग्यच असल्याचे सांगून या प्रतिज्ञापत्रामुळे गरिबांची थट्टा झाली नसल्याचे डॉ. जाधव म्हणाले. २००९-२०१० च्या सर्वेक्षणात शहरी भागात ३२ तर ग्रामीण भागात २६ रुपये खर्च करणारी जनता गरीब नाही. हे नियोजन आयोगाने जे मत मांडले त्याला प्रा. तेंडुलकर समितीचा आधार होता. २०११-१२ या वर्षात या सर्वेक्षणात या आकड्यांचे पुनर्मूल्यांकन होईल तेव्हा हा आकडा वाढलेला असेल, असे जाधव म्हणाले.

सम्राट २८/७/११

News Paper:- सकाळ
Date:- 23 सप्टेंबर 2011

# नियोजन मंडळाची हातचलाखी नाही : डॉ. जाधव

**पुणे, ता. २३ :** "दारिद्र्याचे मोजमाप करताना नियोजन मंडळाने चलाखी किंवा बनवाबनवी केलेली नाही. तसा अपप्रचार काही स्वयंघोषित अर्थतज्ज्ञांनी चालविला आहे. मात्र ते चुकीचे आहे," असा दावा नियोजन मंडळाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी केला.

नियोजन मंडळाने सर्वोच्च न्यायालयास सादर केलेल्या माहितीत गरीब कोणाला म्हणावे, याविषयी आकडेवारी दिली आहे. याबाबत स्पष्टीकरण देताना डॉ. जाधव म्हणाले, "देशात गरिबीचे मोजमाप करण्याची पद्धत त्यासाठी समजून घेतली पाहिजे. प्रा. सुरेश तेंडुलकरांच्या अध्यक्षतेखाली यासाठी २००५ मध्ये समिती नेमण्यात आली होती. या समितीने काही सूत्र ठरविले आणि दारिद्र्यरेषेखालील असण्यासाठी दरडोई दरदिवशी खर्च किती असावा, हे निश्चित केले. शहरी भागासाठी वीस रुपये (दरमहा ५७९ रुपये) आणि ग्रामीण भागासाठी १५ रुपये (दरमहा ४४७ रुपये) असा निकष त्यासाठी लावला.

हा खर्च आता अत्यल्प असणे स्वाभाविक आहे. कारण त्यासाठी २००४-०५ च्या किमती आधारभूत धरण्यात आल्या होत्या. सर्वोच्च न्यायालयाने या खर्चाच्या रकमा महागाई निर्देशांकाप्रमाणे वाढवून देण्यात याव्यात, असा आदेश दिला. नियोजन मंडळाने नेमके तेच केले.

लोकमत २३ सप्टेंबर २०११

# दारिद्र्याचे मोजमाप आणि नियोजन आयोग



भारत सरकारच्या नियोजन आयोगाने सुप्रीम कोर्टात नुकत्याच सादर केलेल्या दारिद्र्यरेषेबद्दलच्या 'ॲफिडेव्हिट'मुळे देशभरात गदारोळ उडाला आहे. आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झडत असल्याने सर्वसामान्य माणसाच्या मनात गोंधळ निर्माण झाला आहे. याबाबतीत नेमके काय घडले आहे ते समजून घेणे अगत्याचे आहे, म्हणूनच 'तत्काळ' स्वरूपाचा हा छोटेखानी लेख.



प्रासंगिक

डॉ. नरेंद्र जाधव

## दारिद्र्याचे मोजमाप

आपल्या देशात दारिद्र्याचे मोजमाप करण्याची कार्यपद्धती (methodology) १९७० च्या दशकापासून विकसित होत आलेली आहे. सुरुवातीच्या काळात प्रा. वि. म. दांडेकर आणि प्रा. रथ या दोन ख्यातनाम अर्थतज्ज्ञांनी 'कॅलरीज'वर आधारित पद्धती मांडली. भारतीय माणसाला प्रतिदिनी दरडोई २२५० कॅलरीजची गरज असते हे गृहीत धरून, तेवढ्या कॅलरीज निर्माण करण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे किती धान्य व अन्य खाद्यपदार्थ लागतील याचा अंदाज घेऊन, प्रचलित किमतीप्रमाणे तेवढे धान्य (व इतर पदार्थ) विकत घेण्यासाठी किती उत्पन्न असावे लागेल त्याच्या अनुषंगाने दारिद्र्यरेषा ठरविण्यात आली. दांडेकर-रथ यांच्या कार्यपद्धतीत सुधारणा करून कालांतराने प्रा. लकडावाला यांचा सुधारित फॉर्म्युला स्वीकारण्यात आला. १९९३ सालापासून दर पाच वर्षांच्या अंतराने नियोजन आयोग हे प्रा. लकडावाला यांच्या फॉर्म्युल्यानुसार भारतीय दारिद्र्याचे मोजमाप करून केंद्र सरकारची अधिकृत आकडेवारी जाहीर करत असतो. या कार्यपद्धतीनुसार अनेक तांत्रिक स्वरूपाचे आक्षेप घेण्यात आल्यामुळे नियोजन आयोगाने २००५ साली प्रा. सुरेश तेंडुलकरच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. त्यांनी डिसेंबर २००६ मध्ये आपला अहवाल सादर केला.

प्रा. तेंडुलकरांनी कॅलरीजवर आधारित पूर्वीच्या कार्यपद्धतीचा अवलंब करण्याचे नाकारले आणि (Consumption-Expenditure)USX आधारित एक नवा फॉर्म्युला मांडला आणि त्यानुसार १९९३-१९९४ आणि २००४-२००५ या वर्षातील दारिद्र्याचे प्रमाण सादर केले.

दोन्ही पद्धतींनी केलेल्या दारिद्र्यरेषेच्या मोजमापापासून एक गोष्ट स्पष्ट होते, ती म्हणजे १९९३-१९९४ ते २००४-२००५ या आर्थिक सुधारणांच्या काळात दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या लोखसंख्येचे प्रमाण वाढलेले नसून कमी झाले आहे. नियोजन आयोगाच्या आकडेवारीनुसार १९९३-१९९४ साली एकूण ३६ टक्के भारतीय दारिद्र्यरेषेखाली होते तर २००४-२००५ या साली ते प्रमाण २७.५ टक्के एवढे खाली आले. प्रा. तेंडुलकरांच्या फॉर्म्युल्यानुसार त्याच कालखंडात ते ४५.३ टक्क्यांवरून ३७.२ टक्क्यांवर आले.

### नियोजन आयोगाची पूर्वीची 'अधिकृत' आणि प्रा. तेंडुलकर यांच्या फॉर्म्युल्यावर आधारित नवी आकडेवारी

**१९९३-१९९४**

| | शहरी | ग्रामीण | एकूण |
|---|---|---|---|
| नियोजन आयोग | ३२.४ | ३७.३ | ३६.० |
| तेंडुलकर समिती | ३१.८ | ५०.१ | ४५.३ |

**२००४-२००५**

| | शहरी | ग्रामीण | एकूण |
|---|---|---|---|
| नियोजन आयोग | २५.७ | २८.३ | २७.५ |
| तेंडुलकर समिती | २५.७ | ४१.८ | ३७.२ |

## आता नेमके काय घडले?

प्रा. तेंडुलकरांचा फॉर्म्युला नियोजन आयोगाने स्वीकारला आणि त्यानुसार कार्यवाही सुरू केली. प्रा. तेंडुलकर फॉर्म्युल्यानुसार दारिद्र्यरेषेखाली असण्यासाठी प्रतिदिनी दरमाणशी खर्च किती होता? तो होता शहरी भागासाठी २० रुपये (म्हणजे महिन्याला सुमारे ५७९ रुपये) व ग्रामीण भागासाठी १५ रुपये (म्हणजे महिन्याला ४४७ रुपये) हा खर्च अत्यल्प वाटतो ना? आहेच मुळी, कारण त्याच्या आधारभूत किमती आहेत. २००४-२००५ सालच्या!

सुप्रीम कोर्टाने योग्य आदेश दिला की या खर्चाच्या रकमा महागाई निर्देशांकाप्रमाणे वाढवून देण्यात याव्यात. नियोजन आयोगाने नेमके तेच केले आहे. २००९-२०१० सालच्या ठररड सर्व्हेवर आधारित माहितीवर तेंडुलकरांच्या फॉर्म्युल्यात मांडलेल्या पद्धतीचा वापर करून प्रतिदिनी दरडोई खर्चाची मर्यादा शहरी भागासाठी २० रुपयांवरून ३२ रुपयांपर्यंत (म्हणजे दरमहा सुमारे ९६५ रुपये दरडोई) आणि ग्रामीण भागासाठी १५ रुपयांपासून २६ रुपयांपर्यंत (म्हणजेच दरमहा दरडोई सुमारे ७८१ रुपयांपर्यंत) वाढविले आहे, यात गैर काय आहे?

आणखी एक स्पष्टीकरण गरजेचे आहे. नियोजन आयोग या आकडेवारीचा उपयोग दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण ठरविण्यासाठी करतो; नेमकी कोणती कुटुंबे दारिद्र्यरेषेखाली येतात हे ठरविण्यासाठी नव्हे! दारिद्र्यरेषेखाली नेमकी कोणती कुटुंबे येतात ते ठरविण्याचे काम ग्रामीण भागासाठी केंद्र सरकारचे ग्रामविकास मंत्रालय करते तर शहरी भागासाठी ते काम केंद्र सरकारचे Housing and Urban Poverty (HUPA) हे मंत्रालय करीत असते. या दोन्ही मंत्रालयांनी त्यासाठी असलेल्या प्रचलित निकषांचा फेरविचार करण्यासाठी स्वतंत्र समित्या नेमल्या असून त्याप्रमाणे त्यावर कार्यवाही होणार आहे. एकूण काय, तर सध्या उघडकीस येत असलेल्या एकाहून एक सवाई घोटाळ्यामुळे अनेकांना यामध्ये नियोजन आयोगाने चलाखी, बनवाबनवी किंवा घोटाळा केला आहे असे वाटण्याची शक्यता आहे. किंबहुना काही स्वयंघोषित अर्थतज्ज्ञांनी सर्वसामान्यांची तशी समजूत व्हावी म्हणून विशेष प्रयत्न चालविलेले दिसत आहेत. ते लक्षात घेऊन हे स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न. निष्कर्ष काय काढायचा ते तुमचे तुम्ही ठरवा.

*(लेखक नियोजन आयोगाचे सदस्य आणि राष्ट्रीय सल्लागार परिषद-नॅकचे सदस्य आहेत.)*